# राजर्षि शाहू महाराज :

## सामाजिक सुधारणा व सद्यःस्थिती

(समाजशास्त्र)



: संपादक :

प्रा.आर.डी.राठोड

: मुख्य संपादक :

प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर

# राजर्षि शाहू महाराज : सामाजिक सुधारणा व सद्यःस्थिती

## (समाजशास्त्र)


**-: संपादक :-**

**प्रा. आर. डी. राठोड**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ,

जि.बीड (महाराष्ट्र)

**-: मुख्य संपादक :-**

**प्राचार्य, डॉ. आर. के. इप्पर**

वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ,

जि.बीड (महाराष्ट्र)


---


अरुणा प्रकाशन, लातूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलंग्नित
जवाहर शिक्षण संस्थेचे, वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ
ता.परळी वै. जि.बीड (महाराष्ट्र)

# समाजशास्त्र विभाग आयोजित

## राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक शोधनिबंध

**राजर्षि शाहू महाराज : सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती (समाजशास्त्र)**

संपादक - प्रा. आर. डी. राठोड
मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. आर. के. इप्पर

---

ISBN - 978-93-5240-092-8

---

**अरुणा प्रकाशन**
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स-अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

---

मूल्य : २८०/- रूपये

---

© सर्व हक्क संपादकाधिन

---

: प्रथम आवृत्ती : ७ मार्च २०१७

---

मुद्रक : आर्टी ऑफसेट लातूर
अक्षरजुळवणी : हिंदवी कॉम्प्यूटर
मुखपृष्ठ संकल्पना : विरू गुळवे

---

* **'राजर्षि शाहू महाराज : सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती (समाजशास्त्र)'** या पुस्तकातील सर्व लेखन,मते आणि अभिप्राय संबंधीत लेखकांचे असून त्या सबंधी प्रकाशक, मुद्रक व इतर सहमत असतीलच असे नव्हे.

ISBN 978-91-524[illegible]92-[illegible]

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

६४. महान समाजसुधारक राजर्षि साहू महाराज व सद्यस्थिति
प्रा.डॉ.वीरश्री वशिष्ठजी आर्य ........................ १९९

६५. स्त्री जीवनातील समस्या निर्मुलनात छ.शाहु महाराजांचे विचार व कार्याचे समाजशास्त्रीय अध्ययन
डॉ. भगवान डोंगरे ........................ २०३

६६. राजश्री छत्रपती शाहू महाराजांचे स्त्री विषयक विचार
डॉ.महानंदा चं.दळवी ........................ २०७

६७. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री विषयक विचार व सद्यस्थिती
डॉ. रेणुका सुनिल बडवणे (भावसार) ........................ २१०

६८. राजर्षी छत्रपती शाहू महारांजांचे महिला संदर्भातील कायदे
प्रा. डॉ. टेंगसे एस.ए. ........................ २१४

६९. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक विचार
डॉ. उल्का देशमुख ........................ २१७

७०. महिला सबलीकरणात शाहू महाराजांचे योगदान
प्रा.सोमवंशी अल्का बाबाराव ........................ २२०

७१. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीविषयक विचार
प्रा. बळीराम पवार ........................ २२३

७२. राजर्षी शाहु आणि महिला सक्षमीकरण
प्रा. गजानन चित्तेवाड ........................ २२६

७३. स्त्री सबलीकरणात शाहू महाराजाचे योगदान
प्रा.श्रीमती सुनिता जगन्नाथ कुकडे ........................ २२९

७४. छत्रपती शाहु महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक धोरण
डॉ. काळे बालासाहेब मुंजाभाऊ ........................ २३३

७५. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री विषयक विचार
प्रा. बावा. ए. एस, प्रा. डॉ. कांबळे व्ही. एम. ........................ २३६

७६. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री संरक्षणविषयक कायदे : एक अभ्यास
प्रा.शिवकुमार उस्तुर्गे ........................ २४०

ISBN 978-93-5240-092-8

# ६८. राजर्षी छत्रपती शाहू महारांजांचे महिला संदर्भातील कायदे

**प्रा. डॉ. टेंगसे एस.ए.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक, व अर्थिक कार्याव्दारे बहुजन समाजाला जागृत करुन त्यांची सर्वागीन प्रगती घडवुन आनणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज. विचारपुर्वक स्विकारलेल्या सामाजिक आणि राजकीय तत्वाच्या बबतीत कोणतीही तडजोड न स्विकारता, या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य छत्रपती शाहू महारांजा जवळ होते. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तीमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरते मर्यादित न राहात, अखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारततही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा, बहुजन समाजाला नेता म्हणुन असलेली त्यांची लोप्रियता शेवटपर्यंत कायम राहीली. सर्वसामान्य मानसाचे कल्याण करण हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व सर्व समाजालाही या कर्तव्यांच्या अनुरोधाने मार्गदर्शन केले. काही उच्च मानल्या गेलेल्या जातींनी आपले वर्चस्व टिकुण राहावे यासाठी बहूजन समाजावर निरनिराळे सामाजिक व धार्मिक बंधने लादलेली होती. या बंधनातुन बहुजन समाजाची सुटका करुन, त्याला सुशिक्षित बनविण्याचे, जाग्रत करण्याचे व प्रगत बनविण्याचे कार्य छत्रपती शाहू महारांजानी केले आपल्या कार्या विषयी होणारी टिका त्यांनी निर्भयपणे सहन केली आपल्या धेयधोरणात व कार्यपध्दतीत बदल केला नाही. त्यांच्या या कार्याबद्दल असामान्य व्यक्तीमत्वाचा बहुजन समाजाचा लोकनेता ते त्यांना लोकप्रियता मिळाली बनले.

**शोधनिबंधाचा उद्येश :-**

शाहू महारांजांचे कार्य अभ्यासने

शाहू महारांजांचे केलेल्या महिला संदर्भातील कम्यदयांचा आढावा घेणे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य साधनांचा आवलंब केला आहे. संदर्भ पुस्तके, मासीके, वृतपत्रे, इंटरनेट यांच्या आधारे माहितीचे संकलन केले आहे. शाहू महाराजांचे कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक आहे.

**शाहू महारांजाचे स्त्रियांसाठीचे कायदे (Acts for Women) :**

समाजात स्त्रीवर्ग हा नेहमीच अपेक्षित राहीलेला दिसुन येतो. भारतीय समाजाव्यवस्था ही पुरुष प्रधान असल्यामुळे पुरुषांना अधिक महत्वाचे स्थान दिले जाते तर स्त्रियांचे स्थान दुय्यम आढळुण येते. स्त्रीयांवर संस्कृती, प्रथा, परंपरा, मुल्ये, नियमनांच्या माध्यमातून जाच जुलूम केला जातो, त्यांच्यावर अनेक प्रकारची बंधने लादली जातात. रुढी, परंपरा जसे की बालविवाह, पडदापध्दती, विधवा विवाहास प्रतिबंध, केशवपण, सामाजिक निर्बंध इ. मुळे

ISBN 978-93-5240-092-8

स्त्रियांचे जिवन इसाह्य परावलंबी व लाचार बनले होते. स्त्रिजीवनाच्या दुर्दशची जाणीव महाराष्ट्रात महात्मा फुंलेना झाली आणि त्यांनी स्त्रीयांची गुलामगिरीतुन मुक्तता करण्यासाठी स्त्रीशिक्षणाचे हत्यार उपसले.

### १) आतंरजातीय धार्मिय विवाह कायदा :

विवाहाचे वय या कायद्यानुसार स्त्रीयांचे विवाहाचे वय १४ वर्षपूर्ण व पुरुषाचे वय १८ वर्ष पूर्ण असे पाहिजे असे बंधने घातले, कारण त्यावेळी मुलामुलींचे विवाह वयाच्या दहावर्षाच्या आतच केले जात असत, त्यामुळे त्या काळात हा कायद्या आधुनिक ठरतो. इग्रजांनी देखील १८९१ साली समंती विवाह कायदा करुन विवाहेत्तर स्त्रीयांचे वय १२ वर्ष असावे असा नियम काढला होता. या कायद्यावर अनेकांनी टिका केल्या परंतु स्त्रियांच्या दृष्टीने हा कायदा महत्वपूर्ण होता.

**विवाहनोंदणी :** अशा झालेल्या विवाहाची रीतसर नोंदणी करण्याची तरतुदही या कायद्यात करण्यात आली तत्कालीन समाज व्यवस्था व परिस्थिती लक्षात घेता आतंरजातीय विवाहाचा कायदा स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरला.

### २) देवदासी प्रतिबंधक कायदा (१९२०) :

मुलीला देवाला सोडण्याची प्रथा म्हणजे देवदासी प्रथा होय ही प्रथा शाहू महाराजांच्या काळातही होती. या अनिष्ठप्रथेमुळे स्त्रियांवर आत्याचार होत असत. या प्रथेमुळे अशा देवाला सोडलेल्या स्त्रियांचा मोठावर्गच समाजात आस्तीत्वात आला. त्यांना जोगीण, भावीण, मुरुळी व देवदासी इ. नावाने वेगवेगळ्या भागात संबांधने जाते. ही प्रथा म्हणजे समाजाला लागलेला कलंक होता. ही वाईट प्रथा थांबवण्यासाठी शाहू महारांजाची देवदासी प्रतिबंध कायदा केला. याप्रथेमुळे ज्या मुलींना देवाला सोडलेले आहे त्यांचा पित्याच्या वारसाहक्काशी व घराशी कोणताही संबध राहत नसे,परंतु देवाला सोडलेल्या ठिकाणची देवस्थाची जी मालमत्ता असे त्याचे परंपरेने हक्क मिळत असत. याला समाजमान्यता होती. देवदासी प्रतिबंधक कायद्याने देवदासींचा असा साजातीकदर्जा नष्ट करुन त्यांना वारसाहक्काने अधिकार प्राप्त करुन दिले.

### ३) विधवा - पुनर्विवाह कायदा (१९७१) :

विधवांचा पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा शाहू महाराजांनी जुलै १९७१ मध्ये संमत केला हिंदुचा पुनर्विवाहास विरोध होता. त्यामुळे विधवांचे जीवन हे कष्टमय झाले होते. ते दुर करण्यासाठी हा कायदा शाहू महाराजांनी निर्माण केला. या विवाहासाठी देखील रितसर नोंदणी आवश्यक मानली कारण की विवाहाची नोंदणी स्त्री जीवनासाठी महत्वपूर्ण होती. तिच्यावर होणाज्या संभाव्य अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी एक शस्त्र कायद्याच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले.

### ४) कौटूंबिक हिसांचार प्रतिबंधक कायदा (१९१९) :

स्त्रीयांवर कुटूंबातुन स्त्रीपुरुष दोघांकडूनही छळ,अन्याय होत असे, परंतु या घरगुती छळाचे स्वरुप असे असायचे की तो गुन्हा सिध्द करणे अवघड ठरत होते, म्हणुन शाहू महाराजांनी अत्यंत बारकाईने विचार करुन कैटुंबिक हिसांचार प्रतीबंधक कायदा केला. या

ISBN 978-93-5240-092-8
कायद्याचा उपयोग कनिष्ठ व वरीष्ट जातीतल्या दोन्ही स्त्रीयांना घरगुती हिंसेच्या विरोधत करता आला पाहिजे, त्यानुसार तरतुदी केल्या. हा कायदा निर्मितीचा उद्देश व त्याच्या निर्मीतीची कारणे काय आहेत हे स्पष्ट करणारा स्वत:च्या सहीचा आदेश शाहू महाराजांनी काढला. या कायद्यामुळे स्त्रियांना घरगुती शिक्षेपासुन संरक्षण मिळण्यास मदत झाली.

**५) स्त्रियांसाठी घटस्फोटाचा कायदा (१९१९) :**

शाहू महाराजांनी २ ऑगस्ट १९१९ रोजी कोल्हापुरचे काडी मोडण्याचे (घटस्फोट) निसम नावाने घटस्फोटासंबंधी कायदा केला. यामध्ये स्त्रियांच्या हक्काचे अन्न वस्त्र व निवाज्याची संरक्षण करते होईल, घटस्फोटनंतर तिच्या अन्न वस्त्ररा चा योग्य ती व्यवस्था कशी केली जाईल याकडे लक्ष ठेवुन कायद्याची तशी कलमे तयार केली. या कायद्यामुळे जातपंचायतीच्या लहरीवर आधारलेला, प्रसंगी स्त्रियांवर अन्याय करणारा, काडीमोड अमान्य करण्यात आला. त्यामुळे स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांना कायद्याने मान्यता प्राप्त झाली.

**६) वारसाचा कायदा (१९२०) :**

शाहू महाराजांनी १७ जाने १९२० रोजी 'हिंदु वारसाच्या कायद्याचा दुरुसतीचा कायदा' या नावाने एक महत्वपूर्ण सामाजिक सुधारणेचा कायदा केला.या कायद्यानुसार शुद्रांची अनौरस संतती व ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य या तीन वर्णाची अनौरस संतती यांना मिळणारा वारसा हक्कातील फरक काठुण टाकला व सर्व वर्णाचा अनौरस संततींना जनक पीत्याच्या मिळकतीतील वारसा हक्क दिला.

**सारांश :** आपल्या देशातील पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रि जातीवर अनेक प्रकारचे अन्याय आत्याचार होत होते. स्त्रियांसर्व प्रकारे उपेक्षीत, असहाय्य व परावलंबी बनल्या होत्या. स्त्रियांवर होणाज्या आत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य शाहू महारांनी स्त्रि शिक्षणास प्रोत्साहन देवुन शिवाय त्यांच्या संरक्षनार्थ विविध कायदे करुन स्त्रिमुक्तीची शुभारंभच केला असे म्हणता येईल.

**संदर्भ :**

१. डॉ. अनिल शिंगारे, डॉ. घुले, महाराष्ट्रातील अंबेडकरी चळवळीचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातुर, २००९, पान. ८६ ते ८८
२. प्रा. कोंडेकर, समाजशास्त्र फडके पब्लीकेशन कोल्हापुर, २०१० पान. ६२ ते ६४
३. प्रा. शेख, प्रा. भद्रशेटे, प्रा.भालेराव, समाजशास्त्रीय विचारवंत अरुणा प्रकाशन, लातुर, २०१०, पान.१४२ जे १४५.
४. रमेश जाधव, राजर्षी शाहू छत्रपती नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, २०१२ पान . ३८ ते ४५
५. टिकेकर अरुण,देणे समाजपुरुषाचे,गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०११ पान. ६६,६७
६. जी. एल. भीडे, एन. डी. पाटील, महाराष्ट्रातील समाज - सुधारणेचा इतिहास , फडके प्रकाशन, कोल्हापुर, २०१३ पान १०२ ते १०५
७. डॉ.आगलावे प्रदीप, डॉ. आगलावे सरोज,समाजशास्त्र,डीनीटी ॲन्ड को. २००७ पान. ५२, ५३

***

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani